

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४८३

# उन्हातल्या

REFBK-0023974
REFBK-0023974

- दत्ता हलसगीकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

8 AUG 1990

( क्र. मा. प. )
५०००-१२-८२

संदर्भ काव्य
२४८३
२३९७४
२५४८३

उन्हातल्या चाँदण्यात

REFBK-0023974
REFBK-0023974

# उन्हातल्या चांदण्यात

दत्ता हलसगीकर

□

**उन्हातल्या चांदण्यात**
प्रथम आवृत्ती : मार्च १९८३.

□

**प्रकाशक :**
प्रा. विलास पाटील
भुईकोट प्रकाशन,
८२, रेल्वे लाईन्स, सोलापूर.

□

**मुद्रक :**
विष्णु विजय
६अ, शनिवार, सोलापूर-४१३००२.

□

**मुखपृष्ठ :**
नागेश सुरवसे
स्टुडिओ नागेश, सोलापूर.

□

© **सौ. वसुधा हलसगीकर.**
६२७, दक्षिण कसबा,
सोलापूर-४१३००७.

**मूल्य : दहा रुपये.**

□

या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेखाली अनुदान मिळाले आहे.

ती. कै. अण्णा,

भर उन्हातही
तुम्ही आम्हाला चांदणेच दिलेत.

## कळा

शब्दकळा पान्हावली अर्थ झुरुझुरु वाहे
माझे सुखदु:ख आज पान्ह्यातून बोलताहे
कळा ऋतुमती झाल्या छळ झाला असा सुरू
ऊन्ह चांदणे उरात कसा स्वत:ला आवरू ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६३
दा. क्र. २३७०४
काव्य २६१९३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## अर्थ

खूप सोसले तेव्हा हा पारिजात फुलला
खूप झेलले तेव्हा हा घननीळ बरसला
खूप पाहिली वाट आणि हे अवचित येणे
किती काळोखानंतर आले सुखी चांदणे !

तप्त मातीवर थेंब जळाचे अत्तर झाले
सोसुन हसता जगण्याचे किती अर्थ कळाले !

# कळा

शब्दकळा पान्हावली अर्थ झुरूझुरू वाहे
माझे सुखदु:ख आज पान्ह्यातून बोलताहे
कळा ऋतुमती झाल्या छळ झाला असा सुरू
ऊन्ह चांदणे उरात कसा स्वत:ला आवरू ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४६३
दा. क्र. २३८०४
काव्य २६१५३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## अर्थ

खूप सोसले तेव्हा हा पारिजात फुलला
खूप झेलले तेव्हा हा घननीळ बरसला
खूप पाहिली वाट आणि हे अवचित येणे
किती काळोखानंतर आले सुखी चांदणे !

तप्त मातीवर थेंब जळाचे अत्तर झाले
सोसुन हसता जगण्याचे किती अर्थ कळाले !

## भान

फुलतानाही किती फुलावे याचे भान असावे
सूरलयीतुन किती बुडावे याचे भान असावे
रोज भेटतो आपण डोळे हरवून डोळ्यांमधुनी
असा सोहळा तरीही रेषेवरती भान असावे

गाठ मारता सरगाठीची आपण सोय पहावी
हरवुन जाता सापडण्याची ठावुक वाट असावी
नाहीतर गुंतणे असे की सुटतानाच्या कळा
म्हणून रुजताना सुकण्याचे शहाणे भान असावे!

# उंची

ज्यांची बाग फुलून आली
त्यांनी दोन फुले द्यावीत
ज्यांचे सूर जुळून आले
त्यांनी दोन गाणी द्यावीत

ज्यांच्या अंगणात झुकले ढग
त्यांनी ओंजळ पाणी द्यावे
आपले श्रीमंत हृदय त्यांनी
रिते करुन भरुन घ्यावे.

आभाळाएवढी ज्यांची उंची
त्यांनी थोडे खाली यावे
मातीत ज्यांचे जन्म मळले
त्यांना खांद्यावरती घ्यावे!

## मोर

इथे तिथे जखमा जखमा
जखमी लोकांची यात्रा भरे
जखमांवरती पसरुन फुले
आयुष्य सजविता येते कां रे ?

असे सजविता आले पाहिजे
अश्रूंचा उत्सव झाला पाहिजे
नाहीतर जखमा बोलू लागतील
म्हणून आपणच गायले पाहिजे

अशा गाण्याने होते काय ?
जखमांवरती सुंदर साय
मोर नाचतो पंखनशेत
विसरुन आपले शापित पाय !

## जन्मभर

दुःखाचे गाठोडे
बांधून पाठीशी
वाट चालायाची जन्मभर

अश्रू लपवीत
ओल्या पापणीत
सुखी कसरत जन्मभर

मनातले कधी
नाही बोलायचे
ओठ शिवायचे जन्मभर.

प्राजक्ताची फांदी
मनात फुलावी
निखाऱ्याची ओवी जन्मभर

कांगावा न कधी
नाही गा तक्रार
दुःख दळदार जन्मभर.

जन्मभर असे
पाळले मी व्रत
आनंदी विरक्त जन्मभर!

## आत्मा

काठाकाठावर उभे राहिलो
पाणी झुळझुळ वाहात गेले
आमचे पाय कोरडे फक्त.

जत्रेजत्रेतून फिरुन आलो
रंगीत झुले पाहून आलो
हललो नाही आम्ही फक्त

अवतीभवती कितीक फुलले
अवतीभवती कितीक जळले
अंगे जपत जगलो फक्त

नाही केली उधळमाधळ
नाही झोकून दिले सकळ
बंद पेटीत पाखरू तसा
आत्मा देहात मेला फक्त !

## पाहिले नाही कुणी !

आमच्या डोळ्यात लपलेले पाणी पाहिले नाही कुणी
सुकून गेलेले स्वप्नांचे झाड पाहिले नाही कुणी
ज्यांनी त्यांनी कोवळ्या फांदीवर रोज गाणी म्हटली
एखादा सूर आमच्या झोळीत टाकला नाही कुणी

केवढ्या आशेने बाहू पसरुन त्यांना हाक मारली
ते उत्सवात दंग, आमचा टाहो ऐकला नाही कुणी
व्याकूळ अश्रूंनी त्यांच्या रस्त्यावर आम्ही सडे घातले
त्यांची मिरवणूक लांबूनच गेली वळले नाही कुणी.

वाटले होते : एकतरी ढग अंगणात थोडा झुकेल
नुसते नगारेच वाजत राहिले भिजवले नाही कुणी !

## बेइमान

जे बेइमान झाले सांडून लोकनीती
त्यांनाच अर्घ्य देती हे लाळ घोटणारे

या मंदिरामधून ज्यांची खुली दलाली
उद्घोषिती तयांना स्वार्थार्थ वाकणारे

साऱ्या सभेतुनी जे आत्मा विकून गेले
त्यांचेच स्तोत्र गाती हे भाट आज सारे

लाचार होऊनिया शृंगारिले स्वतःला
हे अंगणात त्यांच्या अभिमान शिंपणारे

दैवा, तुझी कृपा की ही माजली गिधाडे
ढाळून पंख गेले एकांती मोर सारे!

## ये म्हटल्यावर

ये म्हटल्यावर यायचे नसते
जा म्हटल्यावर जायचे नसते
येणे जाणे दोन्ही वेळी
हातचे राखून ठेवायचे असते.

सगळेच आपले नाते सांगतील
सगळेच गळ्यात गळे घालतील
खरे खोटे त्यांच्या डोळ्यात
नजर रोखून पाहायचे असते

फुलायचे नसते ... झुलायचे नसते
वाहत्या लाटेवर वाहायचे नसते
जिथे तरळते हळवे पाणी
तिथे गुंतून राहायचे असते.

ये म्हटल्यावर यायचे नसते
जा म्हटल्यावर जायचे नसते
तळ्यात मळ्यात पाय ठेवून
गळ्यात काही फुलवायचे असते!

## रमेना माझे मन

घरात दारात कुठेही आज
रमेना माझे मन
झऱ्यात वाऱ्यात कुठेही आज
रमेना माझे मन.

कसा उधळला पाचोळा सारा
कसे हे वादळ झाले?
उजाड झालेल्या बागेत आता
रमेना माझे मन.

कशासाठी आम्ही स्वप्ने रचायाची
आणि ही धावाधाव?
मृगजळामागे धावताना आता
रमेना माझे मन.

बंद दाराआड माणसे सारी
मिठी मी कोणा मारु?
पालवीविहीन जगात आता
झुलेना माझें मन

## कोरडा

माझ्या घरात आता मी पाहुणा असे
माझ्याच आरशाला मी वेगळा दिसे

हा अंगणात माझ्या जल्लोष चालला
हसतात आप्त माझे......मी आगळा हसे

घर बांधुनी सुरेख मी बाग फुलविली
नात्यात या फुलांच्या मी बावळा फसे

ते सोवळ्यात सारी ओवाळती सुखे
मी मात्र दूर येथे हा ओवळा बसे

का जीव लावला मी या वाहत्या जळा?
भिजलो मनी तरीही मी कोरडा वसे !

## आज....उद्या

आज सावली माथ्यावरती
उद्या सूर्य जाळेल कधी
आज मनातुन सुवासगाणे
उद्या सुकून हरवेल कधी ?

आज ओंजळीत शुभनक्षत्रे
उद्या जन्मभर रक्तखुणा
आज नितळ आकाश सुखाचे
वादळेल का कधी पुन्हा ?

अशा धुक्यातुन सुंदर लेणी
कोरायाची तरी कशी ?
अज्ञाताच्या झोक्यावरती
घरटी बांधायची कशी ?

## माणसे

माणसे विसरतात ओळख आणि शब्द
विसरतात आसवे दूध आणि रक्त
विसरतात पाठीशी सावलीचे वृक्ष
आपल्या स्वत:तच ते धुंद मग्न फक्त.

विसरतात फुलांनी घातलेली मिठी
अंधारातच तेवत विझलेल्या ज्योती
विसरतात आकाशाचे आधाराचे हात
आणि कोणी फुलूनही सुकले मनात

आपलीच सावलीही हरवते कधी
अशा माणसांसाठी कां रे जीवात आकांत?

## शब्द

सारे जग दूर झाले, तुम्ही नका होऊ
तुम्ही दुरावल्यावरी सांगा कुठे जाऊ?

वाटेवर भेटलेले वाटसरु सारे
कैक जन्मापासूनिया तुम्ही माझे भाऊ.

तुम्ही माझ्या आनंदाचे भावरुप ध्वज
तुम्हाविना लोचनीचे नीर कोणा वाहू?

तुम्ही माझी शक्ती प्रभो, तुम्ही माझी गती
डोळे गेल्यावरी सांगा, सूर्य कसा पाहू?

किती तरी सांगायचे तुम्हापाशी मला
गळा मिसळून गळा अमृतात न्हाऊ?

तुम्ही माझे रूप, तुम्ही जीव, तुम्ही श्वास
तुम्हाविना माझे गाणे सांगा कसे गाऊ?

जग सारे अग्नि झाले, तुम्ही नका होऊ
मरणाच्या मिठीसाठी किती वाटा धावू?

## विदूषक

जन्मासी येऊन
केले तरी काय ?
नाठाळाचे पाय धुतले गा

ठायी ठायी असा
झालो विदूषक
वाकता कौतुक मीच केले.

विटाळले ओठ
लाचार हासलो
झोळीरुप झालो जगताना.

समजून सारे
झालो नम्र बैल
पाठीवर झूल मिरविली

झूल गेली माझ्या
जाळीत गा अंगा
माझ्यासवे दंगा झाला माझा.

भिर्काविता झूल
हासलो गा स्वच्छ
पोट किती तुच्छ ऐसे झाले !

## मंत्र

ज्याचे जगी कोणी नाही
त्याने माझ्या घरी यावे
माझ्या छपराखालती
दुःख सारे विसरावे

माझ्या ज्योतीच्या तेजाने
त्याने पेटवावा दिवा
त्याच्या प्रवासाचा मार्ग
स्वच्छ सुंदर दिसावा

माझ्या आडातले पाणी
त्याने प्यावे पोटभर
थेंबाथेंबाने कळेल
जग असीम सुंदर

माझ्या अक्षरफुलांची
त्याने वहावी डहाळी
तनमन सुवासिक
अशी किमया आगळी

ज्याचे जगी कोणी नाही
त्याने माझ्या घरी यावे
मंत्र गाण्याचे घेऊन
सूर जगासी वाटावे !

## काही काही

काही तुझे काही माझे
गोफ गुंफू असा
काही घ्यावे काही द्यावे
असा घ्यावा वसा

काही नको नको तरी
ओंजळीत घ्यावे
साऱ्यांनीच नाकारता
कोणीकडे जावे ?

काही जोडू स्वत:साठी
दुज्यासाठी मोडू
काही जिवलगासाठी
जन्म स्वच्छ झाडू

काही काही जमविता
काहीतून सुटू
आणि काही फुलविता
आनंदात मिटू !

## सुखे

सुखे अशी वादळून घ्यायची नसतात
प्राजक्तफुलासारखी नाजुक वेचायची असतात
झुळुकीसारखी मनाभोवती लपेटायची असतात
गाण्यासारखी मनात रुणझुणायची असतात

प्रियेच्या मधुर ओठासारखी टिपायची असतात
पहिल्या पावसासारखी झेलायची असतात
चोरभेटीतल्या स्पर्शासारखी थरारुन आठवायची असतात

सुखे अशी वादळून घ्यायची नसतात
मेंदी रंगलेले सुंदर हात हातात घ्यावेत
तशी हळुवार ओंजळीत घ्यायची असतात
आपलीशी करायची असतात.

## पाऊस

संथ लयीत पाऊस बरसताना
ढग कसे मायाळू होऊन झुकलेले
डोंगर रानातून अभिषेक संततधार पावसाचा

पाऊसधारात भरुन वाहणाऱ्या
नदीच्या आनंदपात्रात
झोकून द्यावे वाटते स्वतःला डोळे मिटून.

मी खिडकीशी उभा राहूनही
ह्या झाडांत... डोंगररानात ...नदीच्या वाहत्या पाण्यात

विसरत चाललोय मी स्वतःला
मी या पाऊसधारातील एक अनावर थेंब !

# हात

आयुष्याच्या आजवरच्या युद्धात
तसे अपयशच खूपदा आले.
दान नेहमीच मनासारखे नाही पडले
खूपदा दाराशी आले ते परत फिरले
उभे राहिलेले उन्मळून गेले
ओंजळीत भरलेलेही सारे ओघळले
हे सारे शांतपणे मनाने पचविले
कारण ह्यामुळे एक ठावूक झाले की
किनाऱ्यावर आलो असतानाही
काठावर घेणारे
तुझे हात तेवढे कमी पडले.

## गर्दी

गर्दी टाळून एकांतासाठी
स्वत:शीच बोलण्यासाठी
फुलांच्या बागेत निवांत आलो
तर टोकदार काटचांनी इथेही रक्तबंबाळ केलेच.

पायाखाली लुसलुशीत हिरवळ
सुंदर फुलांचा प्रसन्न दरवळ
डेरेदार झाडे दाट सावल्यांची
बस्स, एवढचाच सुखासाठी इथे आलो तर
निवडुंगाने फणा उभारलाच भीषण.

चैत्रात विहरणारा डौलदार मोर
रंगीत सानुली नाजुक फुलपाखरे
सुवासिक आंबराईतील उत्कट कोकिल
यांच्या मैत्रीत रमण्यासाठी इथे आलो तर
कर्कश्श्य कावळे इथेही झेपावत गेलो

सारांश : भेटणारे कुठेही भेटते
यासाठी गर्दीतही गाणे म्हणायला हरकत नाही.

## ओझे

ओझे उचलताना कुठे ठावूक होते
ही वाट संपणारी नाही म्हणून
वाटेत फुलांनी हाक मारली
तेव्हाही पाठीवरचे ओझे खाली ठेवले नाही.
कधी ओझ्याने पाठ भरुन आली
तेव्हाही ओझे टाकून दिले नाही.

रात्र आणि रात्र यामध्ये
दिवस नावाचे एक सुंदर स्मित.
त्यामुळे ओझे मोरपिसासारखे हलके झाले.

कितीकांनी ओझी सोडली माझ्यापुढे
आणि नाकारली परत पाठीवर घेण्यासाठी.
ओझे हलके वाटण्याचा मंत्र त्यांच्या कानात सांगितला
आणि गाठोड्यासह परत पाठवले.
(हे ओझे आम्हाला कां बरे मिळाले ?)

हे ओझे कधी काळी परत करताना
आभार मानणारच आहे.
या ओझ्यामुळे जगातले कितीतरी तराजू कळून आले.

## हेतु

जगायला तसे हवे तरी काय ?
आभाळात डोळे भूमीवरी पाय

मनापरी निळे मोकळे आकाश
झुंजुमुंजु नवा पहाट प्रकाश

सुवासिक फुले ऊरभर गंध
पाखर गाण्याची किलबिल मंद

हिरवी नाजुक खुळी पायवाट
पाण्यात भिजलेला मंदिराचा घाट

आषाढघनाचा पाऊसउत्सव
काळोखरात्रीचे नक्षत्रवैभव

भेटीने कुणाला भेटीचेच सुख
वियोगात किती आठवावे दुःख?

कुणासाठी तरी घनघोर युद्ध
जखमा घेऊन मिरवावे विद्ध

जयपराजय कुणासाठी तरी
कुणी फुलताना सुकायचे उरी

साद साद आर्त खोल प्रतिसाद
नादातच जावा मिसळून नाद

जगायचा तसा तसा काय हेतु?
फुलणारे मन वेढणारे ऋतु !

## एकांत

एकांतात आपण खरे असतो
आपल्या कुरुप सुरूपतेसहित
एकांतात आपण पाहतो आपल्याकडे
आणि समजतो
किती खरे खोटे जगतो या जगात.

मनसोक्त रडतो एकांतात
तेव्हा एकांत पाठीवरुन हात फिरवितो.

एकांत सांगतो जगण्याचा अर्थ किंवा अनर्थ
एकांतात आपला संवाद आपल्याशी.

खरे तर आपण एकटेच
या लहानमोठ्या प्रवासात.
हे एकांतातच कळते.
एकांत किती समजूतदार करतो आपल्याला.

स्वच्छ पाणी पिण्यासाठी नदीच्या उगमाकडे जावे
तसा हा एकांत.

## सोबत

कुणीच नाही सोबत आले तर
आपली वाट आपणच चालायची आहे की!

येणारे तरी किती वेळ सोबत करतील
वाटेत बागा दिसल्या की पांगतील.
झुळझुळते झरे दिसले की थांबतील.
हवी तशी सावली मिळाली की विसावतील
यासाठी सोबतीचा भरवसा धरु नये.
सोबतीतही आपण खूपदा एकटेच असतो.

कोणी सोबत आलेच तर
रात्री जागवीत वाटचाल करावी
नाही तर
आपल्या मनाशी होणार आपला संवाद
अखेरपर्यंत आहेच.
वाटही मग आपल्याला जीव लावील.

## भेट

मरणा कधीही ये तू मी हा तयार आहे
घर आवरुन झाले, तुज भेटणार आहे.

आनंदधुंद आहे आयुष्य भोगताना
साफल्य जीवनाचे मी वाहणार आहे.

जत्रेत रंगलो मी, माझ्यात दंगलो मी
मी गुंतलो किती रे ते सांगणार आहे.

येथे क्षणाक्षणाला लोभून जीव गेला
सारी सुखे भरुन मी आणणार आहे.

भीती मला तुझी ना, तुज जाणतो कधीचा
ये, स्वागतास गाणे मी गुंफणार आहे.

गंभीर होऊनिया मित्रा, नकोस येऊ
आता नवीन विश्व मी पाहणार आहे.

## सावळी पहाट

सावल्या पावलांवरी
आज ठेविला मी माथा
अंतरीच्या साऱ्या व्यथा संपल्या हो.

ऐसी सावळी पाऊले
डोळे भरोनी पाहिली
गंगा पुण्यमयी झाली अश्रूरुप

सावळ्या पावलाचे काय
मी गा सांगावे कौतुक?
मज सुखाचेही सुख सापडले

अशा सुभग पाऊली
माझे विसावे ललाट
उरी सावळी पहाट पांडुरंगे !

## ऐलपैलकाठ

सुरामागे धावे सूर
आणि लाटेमागे लाट
तसा प्रवाही मी झालो
फक्त तुझी पायवाट

पायी मोहनुपुरांचे
झाले सुरेल बंधन
बंध तोडुनिया दिसे
तुझ्या मंदिराचा घाट

वाट चालता चालता
लागे तुळशीचा मळा
टाळ चिपळ्यांचा लळा
माझे उजळे ललाट

अशी सोयरीक केली
नाते तुझ्याशी जोडले
माझ्या सुखदु:खा नाही
आता ऐलपैल काठ !

## पारध

गुंतवळ सुटू नये अशी केली माया
मन रमूनिया जावे अशी दिली छाया
अशी केली भुलावण भुलूनीच गेलो
गाव सोडायाचे तेही विसरून गेलो

कळालेच नाही कसा इथे घोटाळलो
सोबतीचा दिवा इथे टांगून राहिलो
हातातली काठी अशी रोवली मातीत
फळे फुले त्याच्यावर पाहात राहिलो

असा बेरकी तू देवा चाटविला मध
जाळे सुखाचे टाकून केलीस पारध!

## कोण ?

रानामधल्या झुळझुळ झऱ्यातून
रुमझुम आवाज कुणाचे?
उंच उंच दाट वेळूबनातून
बासरीचे नाद कुणाचे?

फांद्याफांद्यावर कोवळ्या पहाटे
किलबिल वेद कुणाचे?
दूर देवळात घंटानादात
गंभीर ओंकार कुणाचे?

मातीमधून आभाळातून
मनामधून गातोय कोण?
आतल्या आत मला भेटून
या ओळीतून नटतोय कोण?

## नाते

नाते देवासी जोडले
दुःख दारिद्र्य सरले
नाते नभासी जोडता
चंद्र सूर्य घरी आले

नाते जोडता बीजासी
तरू अंगणात उभा
घरादारावरी छाया
देतो प्रकाशाचा गाभा

नाते जोडता पान्ह्यासी
तृप्त भरे देहमन
आता कोठली गा चिंता
मायबाप नारायण

असीमासी जवळिता
सीमा गेल्या विर्घळून
मिळे समुद्राला थेंब
थेंब गेला समुद्रून

## प्रिय

मी असा मी तसा प्रिय मी तरी तुला
मी वारा मी पारा, प्रिय मी तरी तुला

मी न ऐकतो तुझे, पाश ना मला तुझे
मी हवेत ना कवेत प्रिय मी तरी तुला

मी न या जनी मनी, मी घरी तरी वनी
मस्त मी गायनी प्रिय मी तरी तुला

गर्जतो कधी कधी बरसतो कधी कधी
उगवतो तुझ्यामधी प्रिय मी तरी तुला

तुझेच पंख घेऊनी भरारतो नभातुनी
दुरावतो स्वतःतुनी प्रिय मी तरी तुला

तुझा मला किती लळा, तुझ्याविना किती कळा
मी फुंकर मीच झळा प्रिय मी तरी तुला

## नकार

खूप होते बोलायाचे
बोललो न काही
खूप फुलायाचे होते
उमललो नाही

फांदी फांदी आली पुढे
पुन्हा गेली दूर
जुळत जुळत आल्या तारा
जन्मला न सूर

पोटातले कितीतरी
ओठावर आले
पापण्यात आसवांचे
पूर साठविले.

खरे सांगू? मन झाले
नाजूकसे काही
तुझ्या नकाराची भीती
बोललेच नाही.

## स्पर्श

पहिला स्पर्श नाजुक फुलासारखा झेलला
कोवळ्या उन्हासारखा अंगाभोवती लपेटला
चांदणे पाण्यात झिरपावे तसा मनात झिरपला
अंगभर फुलांचा गंधोत्सवच झाला.

पहिला स्पर्श एकांतात किती गडद झाला
अक्षराशिवाय कितीतरी सुंदर बोलून गेला
त्यात तुझ्या डोळ्यांनीही असे चेटुक केले
पहिला स्पर्श कामदीपात संथ तेवत राहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८६३
दा. क्र. २३९८४
ता. २८।५।८३
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## हिशेब

काही दिले घेतलेले त्याचा हिशेब कशाला ?
काही उधळमाधळ त्याचा हिशेब कशाला ?

प्रीत अनावर तेव्हा असे झुलायचे झाले
झोके आभाळा पोचले त्याचा हिशेब कशाला ?

कधी मौनात गुंतलो कधी डोळ्यात भिजलो
कधी विर्घळून गेलो त्याचा हिशेब कशाला ?

आली भरती एकदा आता ओहोटीत जन्म
काठ राहिला एकटा त्याचा हिशेब कशाला ?

## कर्पूर

किती खळाळ हसणे !
किती आलीस फुलून !
जसा काय गुल्मोहर
बहरला फांद्यातून.

किती आर्जव सुंदर
किती आतिथ्याची घाई
असे प्रसन्न स्वरूप
कुठे पाहिलेच नाही.

फांदी फांदी झुके झुके
अशी माझ्या पुढे पुढे
अनावर हा समुद्र
भरतीने काठ बुडे.

असा मोकळा स्वभाव
जरा असावीस दूर
भय वाटे, शालीनते
माझा पेटेल कर्पूर !

## सूर्य बुडताना

उगवत्या पहाटे मी तिला म्हणालो:
दिवस संपून जेव्हा उन्हे उतरतील
आणि सावलीही राहणार नाही मागे
तेव्हा तुझे हात या हातात असतील ना ?

खरे तर मी असे विचारायला नको होते.
पण मातीत खोलवर रुजलेल्या झाडालाही
उगाच वाटते :
भयाण वादळाच्या काळोखरात्री
मातीची मिठी सैल होईल काय ?

विचारायचे कारण :
या सहवासाने माझे सर्वपण तिचे झालेले.
श्वास : स्पंदने : सुख दुःख जन्म मरण ...

म्हणून म्हणालो :
सूर्य बुडताना मला लपेटून राहशील ना ?

## जातकुळी

सावली धरून ढग सरकत होते
तेव्हा जमीनीवरच्या रेषा
चिक्कण मातीतून थेंबासाठी आतुर.

ढग पाण्याने ओथंबलेले
असे खालती झुकलेले की
मातीने मोरासारखा पिसारा फुलवावा.

ढग फसवे
झुकून झुकून आशा लावून
आले तसे गेले निघून.

मातीने उलायचे तरी किती ?
फुलायचे तरी किती ?

तुझी आणि त्या ढगाची जातकुळी
एकच काय ?

## तुझ्यासाठी

"मी तुझ्यासाठी आले"
असं म्हणालीस तेव्हा
फुलं आली माझ्यातल्या 'मी' ला.

आपण आवडतो कुणाला तरी
एवढं खूप असतं जगायला.

आपल्यासाठी कोणी वाट पाहतं
एवढं खूप असतं चालायला.

आणि आपल्या आठवणीत
कोणी जन्म काढतं
एवढं खूप असतं
आपल्या असायला......नसायला.

## जर यायचेच आहे.

का लाजशी अशी तू जर यायचेच आहे ?
संकोच कां असा जर उमलायचेच आहे ?

हा चैत्र ये फुलोनी ये जीवनी वसंत
का गूढ मौन ऐसे जर गायचेच आहे ?

ये पौर्णिमा उरी ह्या हे चांदणे सुखाचे
दारात कां उभी तू जर न्हायचेच आहे.

आता न राहवे गे वेगे मिठीत ये तू
त्या वाहत्या हवेतून जर जायचेच आहे.

## संवाद

तिचे झाड
नेहमीच हिरमुसलेले
वसंतऋतूतही उदास अन् रडवेले.

मी एकदा तिला म्हणालो
"उमलत्या वयात असा संन्यास बरा नाही"

ती निस्तेज हसली.
डोळ्यात ढगांचे काहूर
म्हणाली, "ह्या झाडाच्या फांदीला कान लाव
आणाशपथांचे संवाद
जीव गुदमरुन टाकतील"

निबिड अरण्यातून इथवर कसे आलो
याचा विचार करतो तेव्हा कळते
तुझ्या कोमल हातांची पकड किती घट्ट होती !
□
एकदा माझ्या डोळ्यात पाहून
कपाळावर लालजर्द कुंकू रेखलंस
तो उगवता सूर्य
जन्मभर माझ्या प्रवासासाठी !
□
कालची नक्षत्रांची रात्र
आजची प्रसन्न सकाळ
दोन्ही तुझीच रूपे
अंधार प्रकाशात विलोभनीय.
□
चांदीची जोडवी घालून घरभर फिरताना
फरशीवर फुले पाऊलठशांची.
माझ्या कवितांच्या ओळी त्यांच्यासाठी पायघड्या म्हणून.
□
घराच्या सुखासाठी
तू उपासतापास करतेस
म्हणूनच दुःखे उंबरठ्याच्या आत
येऊ शकत नाहीत
□
थकून आल्यावर
आपलं स्वागत करणारं कुणीतरी आहे
केवळ एवढ्या कल्पनेने
मी कामाचे डोंगर उपसतो.
□

निरोप देताना
दाराच्या चौकटीत उभी राहतेस
ही सुंदर फ्रेम डोळ्यात ठेवून
दिवसभर मी कार्यमग्न.

□

मी खूपदा रागावतो
तरीही तू विलक्षण शांत
तेव्हा मी तुझ्यापुढे लहान होतो.

□

जगभरच्या संगीत मैफलींचा आनंद
मनमुराद लुटला.
पण रात्री माझ्या सहवासात असतानाचा
कांकणाचा मधुरनाद
माझ्या शरीरभर रुणझुणत असतो.

□

काहीवेळा संकटे अशी आलीं की
सारे टाकून पळून जावेसे वाटले.
तेव्हा तुझ्या करुण आर्द्र डोळ्यांनी
फुलांचे अडसर घातले.

□

जीवनातले सगळेच क्षण मला प्रिय
मोहराचे ... पाऊसधारांचे ... शिशिराचे
सगळ्या क्षणात तू माझ्याशी एकरूप म्हणून.

□

" Behind every successful man
there in a woman "
हे वाक्य परवा कुठे तरी वाचलं.
लेखक आपल्या घरी कधी आला होता ?

□

## जिद्द

वादळे जिंकावयाची जिद्द माझी नेहमी
कैकदा सामर्थ्य माझे घाशिले दैवावरी
मी अशक्याचाही सिंधु कैकदा ओलांडिला
वादळे चुरगाळिली अन् घेऊनी दोन्ही करी.

झुंजुनी रक्ताळले हे हात, माथा भंगला
मी मुठीतील शस्त्र माझे सोडले नाही कधी
आणि आलिंगावया मृत्यूही आला एकदा
याच खड्गाने तयाची सावली मी रोधिली.

हा असा अभिमान माझा, मस्तकी कीर्तीतुरे
हे असे सामर्थ्य माझे जिद्द ही वेडीपिशी
विक्रमाच्या पावलांशी दैव झुकते हे खरे
जाण आहे, नेहमीचा तूच माझ्या पाठीशी.

## दिवस

एखादा दिवस असा भावनाच नसलेला
रंगहीन रूपहीन कोठेतरी चुकलेला
एखाद्या दिवसाला यक्षाची आर्त व्यथा
पापण्यात भिजलेली अश्रूंची करुण कथा.

नृत्यमग्न मयुरापरि दिवस रम्य एखादा
मदिरा मदिराक्षीपरि धुंद दिवस एखादा
एखादा दिवस शांत संतापरि सात्त्विकसा
घननीळास्तव वेडा मीरेचा सूर जसा.

एखादा दिवस कसा समईतिल ज्योतीचा
एखादा थरथरता वा भयाण रातीचा
चांदण्यात अश्रुबिंब दिवस दुःखी एखादा
निर्झऱ्यात फुलणारा मनसुंदर एखादा.

## सकाळ

ही सकाळ किती सुंदर !
ईश्वरा !
या जीवाला सकाळचे मनोहर प्रसन्नपण दे.
सूर्यकिरणांचा स्पर्श दे.
नवनिर्मितीक्षम जाग दे.
चिमुकल्या पाखरांसारखा हर्षोल्लास दे
वेलीवरच्या कळ्यांसारखा
निष्पाप सुवासगर्भ विकास दे.
देवळातल्या घंटेसारखा पवित्रसा ओंकार दे.
झुळझुळत्या वाऱ्यासारखी
सुखद सुखद गति दे.

रात्रीच्या खडतर प्रवासातून
ही सुंदर सकाळ उगवली आहे.
सर्वेश्वरा !
या वास्तवाचे मला भान आहे
म्हणूनच
ही सकाळ माझ्या कणाकणातून
भरुन राहू दे !

## आकाश

आकाश निरभ्र माझ्या मनासारखे
आकाश प्रसन्न माझ्या सुखासारखे
आकाश मेघमय माझ्या दयेसारखे
आकाश उदास माझ्या वेदनेसारखे

आकाशाची विविध रूपे : माझा उदय अस्त
आकाशामधून कोण मला घालताहे गस्त ?

## झाडे

झाडे रानभर
झाडे आकाशापर्यंत
झाडे रस्त्यावर दुतर्फा
झाडे पाण्यात डोकावणारी
झाडे नदीच्या पल्याड
झाडे पावसात भिजणारी, उन्हात जळणारी
चांदण्यारात्री न्हाऊन उमलणारी
झाडे अंगणात
झाडे मनात अहोरात्र.

डेरेदार झाडांनी समृद्धपण सांगितले,
बाभळींनी काटेरी दुःख
आणखीन् कोणी काही काही
काहींनी मौनच सोडले नाही

खरे तर माझ्यासारखी पांखरे
अशा झाडांमुळेच जिवंत.

## वार्ता

कुणाजवळ देऊ नयेत
आपल्या दुःखांची कोमजलेली फुले
कारण वाऱ्याबरोबर त्यांचे निःश्वास
दाही दिशांना पसरतात.

मग होते काय ?

मग आपण ज्या झाडाजवळ जाऊ
ती झाडे फुलण्याऐवजी
काटयांनी डसतात.

आपल्या कोमेजल्याची वार्ता
तिथे आधीच पोचलेली असते.

## वाटेवर

वाटेवर प्रत्येक झाडाने सावली धरली
म्हणून खरे तर प्रवास होऊ शकला.
झाडेच नसती तर पाय किती म्हणून
चालले असतें ?

रखरखत्या उन्हात पोटाशी धरणारे
मायाळू हात दिले झाडांनी फांद्यांमधून
आणि याहीपेक्षा तत्त्व सांगितले :

आपला प्रवास आपणच करावा,
खडक फोडून पाण्याचा शोध घ्यावा,
उन्हाचे, पावसाचे, नक्षत्राचे आभाळ माथ्यावर
याची जाण असावी.

फुले येतील ती वाऱ्यासरशी वाटून टाकावी
आणि आपणच एक झाड व्हावे
सावली देणारे
कुणाच्याही प्रवासाच्या वाटेवर .........

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## नाते : पानाफुलांशी

पानाफुलांशी आता जोडले आहे नाते
कारण तेवढीच आता इमान राहिली आहेत.

मनाचे आकाश ज्यांच्यापाशी मोकळे केले
त्यांनी शद्बांना मसाला लावून लोक भडकावले.
माझ्याच सुखदुःखाच्या शस्त्रानिशी
त्यांनी मला खिंडित पकडले.
उत्कट होऊन् तळातलेही सांगितले.
वाटले नव्हते, ह्या कवच कुंडलाचे हत्यार
ते माझ्यावर उगारतील म्हणून.

खरे सांगू ?
गळा मोकळा करावा असे कुणी वाटतच नाही.
म्हणूनच आकाशाच्या घुमटाखाली
पानाफुलांशी नाते जोडले आहे
झाडे मला कुशीत घेतात.

## बहर

हे फुलांचे बहर
येतच राहिले फांदीवर
अशा वैराण वैशाखातही.
झाडांनी तशी शपथ घेतली होती
की जळतानाही फुलेन
आणि सावलीने कुरवाळेन.

एवढे लक्षात आले तरीही खूप.
सारे उधळून कसे प्रेम करावे
हे तरी कळेल.

## तक्रार

उन्हात फुलणारी झाडे लक्षात ठेवावीत
म्हणजे होते काय ?
आपल्या दुःखातही आपण
ओठावरचे हासू पुसणार नाही.

निवडुंगाला जेव्हा फूल आलेले पाहिले
तेव्हापासून
मी तक्रार करायची सोडली आहे.

## मी फुलताना

मी फुलताना तिकडे कोणी सुकत नाही ना ?
मी सजताना तिकडे कोणी भिजत नाही ना ?
माझ्या दारी उत्सवमांडव हा असताना
दूर कुठे अंधारी कोणी खिन्न नाही ना ?

सुखातही मी असा उदासुन येतो कधीकधी
माझे गाणे कुणा अश्रूंनी चिंब नाही ना ?

## पानझड

झाडांनो, तुमचे एक बरे असते
पानझडीचे वरदान आहे म्हणून
शिशिरात पानाबरोबर अश्रूपातही करता येतो.
रडणेही मुष्कील असते अशा काळात
गुपचूप रडून मोकळे होता येते.

जन्मठेपेच्या शापात वैराण वाळवंटात सरणावर
आमचे प्रिय ठेवतानाही
आम्ही हंबरडा फोडू शकलो नाही.

नक्षत्रांचे दान मागितल्यावरही
ओंजळ काटयांनी भरली
तेव्हाही निमूटपणे सारा दंश अंगभर सोसला;
शिवून घेतल्या जखमा बेमालूम
वर अंगरखे घातले फुलाफुलांचे.
सारेच हरवून पोरके झालो
एवढया गर्दीत एकटे झालो
तरीही डोळयात पाणी जमू दिले नाही.
लोकलाजेस्तव शोकही केला नाही.

अश्रूंना पापण्यात अडवले तेव्हा
आतल्या डोळयात केवढे वादळ झाले.
अश्रूंना समजूत घालून गोठविले
तेव्हा जिभेवर वेदनांचे खारटपण दाटून आले.
असह्य होते जगणे तेव्हाही रडायचे नसते.
अश्रूंचे अर्थ इथे कुणाला समजतात?

तुमचे एक बरे आहे झाडांनो,
पानझडीत गुपचूप रडून घेता येते.

## साक्ष

माझ्या असणेपणाची साक्ष म्हणजे माझ्या कविता
नाही तर मी आहे नाही असा.

गुल्मोहराचे लालबुंदपण ह्या रक्तातून
पाण्याचे नितळपण हृदयामधून
वाऱ्याचे मधुमंद झुळझुळणे स्पंदनातून
आकाशाचे असीमपण माझ्या कवेतून
उगवत्या...माध्यान्हीच्या...मावळत्या सूर्याचे प्रकाशरूप डोळ्यामधून.
मातीचे फलदायी सृजन शब्दाशब्दातून.

हुंदक्यानी भरलेले आभाळ
शब्दातून वाहताना काळीज किती हळवे !
आनंदाच्या पताका मिरविताना शब्द नृत्यमग्न.
विषादाचे कडवट घोट घेताना
शब्द जखमी झालेल्या स्वाभिमानी सिंहासारखे.
कधी वादळाशी झुंज देताना
शब्द पेटून उठतात सुरुंगातल्या दारुसारखे.
शब्द निनादतात कधी टाळमृदुंगासारखे.
विश्वस्वरुप होतात विठोब्बारायाचे वारकरी होऊन.

सृजनशील धरतीची साक्ष म्हणजे
हे हिरवे उमलते सळसळते निसर्गरूप.
न पेक्षा ही काळी वांझ माती.
माझ्या अस्तित्वाची साक्ष म्हणजे माझ्या कविता
नाही तर मी आहे नाही असा.

## आयुष्य

हे असे आयुष्य थोडे सूर तू लावून घे
चांदण्या रात्री फुलांच्या तू सुखे नाहून घे
पाश नाजुक रेशमाचा त्यातुनी गुंतून जा
मोह जो लोभावतो तू त्यातुनी रंगून जा.

तो पहा रे डोह काळा, दिवस ही लागे बुडू
जीव जडला त्या क्षणांना एकदा चुंबून घे.

## थेंब

येथला हा जीव लागे तोवरी गाईन मी
बंध येथे गुंतलेले तोवरी राहीन मी
या जगाचा मोह ऐसा मी पुरा नादावलो
वाहते आहे नदी ही तोवरी वाहीन मी.

ही कशी भानामती मांत्रिका केलीस तू?
चांदण्याचा थेंब तोवर ऊन्हही साहीन मी.

प्रिय रसिक :

'आषाढघन' हा माझा पहिला कवितासंग्रह.
त्याला आज दहा वर्षे झाली.
त्यानंतर ओंजळीत बरेच काही आले.
आभाळही खूपदा बदलले.
ऋतुचक्राने आपले रुप दाखविले.
ते तटस्थपणे पाहताना
नाही म्हटले तरी त्यात सापडलोच.

हे जग पहाताना आश्चर्य वाटले, आनंद वाटला,
कधी उदासही झालो.
कधीकधी तर स्वत:मधूनही दुरावलो.

लिहावसे वाटले म्हणून लिहिले.
जे लिहिले ते एकत्र करुन हे पुस्तक झाले.

हा कवितासंग्रह म्हणजे सगळा मी नव्हे.
कारण कितीही सांगितले तरी पुन्हा काहीतरी उरतेच.
जेवढे यातून देत आहे ते तुमच्यापर्यंत पोचावे
एवढीच अपेक्षा.

हा संग्रह प्रसिद्ध व्हावा यासाठी
अनेकांनी मला सहकार्य केले.
त्यांचे प्रेम ही माझी ठेव आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२८८३
दा. क. २३८८४
काव्य २८५८३
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)

**दत्ता हलसगीकर**

REFBK-0023974

## उन्हातल्या चांदण्यात

अर्थ १ / भान २ / उंची ३ / मोर ४ / जन्मभर ५ / आत्मा ६ / पाहिले नाही कुणी ७ / बेइमान ८ / ये म्हटल्यावर ९ / रमेना माझे मन १० / कोरडा ११ / आज ... उद्या १२ / माणसे १३ / शब्द १४ / विदूषक १५ / मंत्र १६ / काही काही १७ / सुखे १८ / पाऊस १९ / हात २० / गर्दी २१ / ओझे २२ / हेतु २३ / एकांत २४ / सोबत २५ / भेट २६ / सावळी पहाट २७ / ऐलपैल काठ २८ / पारध २९ / कोण ३० / नाते ३१ / प्रिय ३२ / नकार ३३ / स्पर्श ३४ / हिशेब ३५ / कर्पूर ३६ / सूर्य बुडताना ३७ / जातकुळी ३८ / तुझ्यासाठी ३९ / जर यायचेच ४० / संवाद ४१ / सहवासाच्या कविता ४२ / जिद्द ४४ / दिवस ४५ / सकाळ ४६ / आकाश ४७ / झाडे ४८ / वार्ता ४९ / वाटेवर ५० / नाते पानाफुलांशी ५१ / बहर ५२ / तक्रार ५३ / मी फुलताना ५४/ पानझड ५५ / साक्ष ५६ / आयुष्य ५७ / थेंब ५८.